# जाहिरात

## जिल्हा व सत्र न्यायालय, रत्नागिरी

जिल्हा न्यायालय, रत्नागिरीचे आस्थापनेवर खाली नमूद केलेल्या पदाकरीता उमेदवारांची निवड यादी तयार करण्यासाठी जाहिरात प्रसिद्धीच्या दिनांकास पात्रता धारण करणाऱ्या उमेदवारांकडून **ऑफलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

| पदाचे नाव | वेतनस्तर | निवड यादी |
|---|---|---|
| **सफाई कामगार (पूर्णवेळ)** | सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी<br>एस–१ : १५०००–४७६००<br>अधिक नियमाप्रमाणे देय भत्ते. | १ |

उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या **खंड 'ड'** मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे इत्यादीच्या छायांकीत सत्यप्रतींसह **परिशिष्ट - अ** मधील नमुन्यानुसार, लिफाफ्यावर '**सफाई कामगार पदाकरीता अर्ज**' असे लिहून दिनांक **१५ फेब्रुवारी २०२५** रोजी सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी पोहचतील या बेताने **खालील पत्यावर** फक्त नोंदणीकृत डाक पोच पत्राद्वारे (R.P.A.D.) किंवा शिघ्र डाक सेवाद्वारे **(Speed Post)** पाठवावेतः-

**मा. प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**
**खारेघाट रोड, ता.जि.रत्नागिरी - ४१५६१२**

नोंदणीकृत डाक पोच पत्र (R.P.A.D.) किंवा शिघ्र डाक सेवा**(Speed Post)** व्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातुन किंवा वरील नमूद केलेल्या दिनांका नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा तसेच लिफाफ्यावर '**सफाई कामगार पदाकरीता अर्ज**' असे नमुद न केलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे झालेला विलंब विचारात घेतला जाणार नाही.

### अ) पात्रता

१. उमेदवार भारताचा नागरिक असावा.

२. सुदृढ शरीरयष्टी आणि सफाई कामगार पदाचे समारूप काम करण्याची योग्यता असणारा.

**अनुभव -**

उमेदवाराला शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

**वयोमर्यादा -**

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| **खुला** | १८ वर्षे | ३८ वर्षे |
| **मागासवर्गीय** | १८ वर्षे | ४३ वर्षे |

**कामाचे स्वरुप -**

अ) निवड झालेल्या उमेदवारांची, जेथे नियुक्ती केली जाईल, तेथील न्यायालय, इमारतीची, इमारतीच्या परिसराची, निवासस्थानाची व कार्यालयांच्या प्रसाधनगृहांची नियमित स्वच्छता व साफसफाई करणे आणि निगा राखणे.

ब) न्यायालय इमारतीच्या आवारातील बागेची निगा राखणे.

क) वरील 'अ' आणि 'ब' मध्ये नमुद केलेल्या कामाव्यतिरीक्त न्यायिक अधिकारी यांच्या निर्देशानुसार आवश्यक ती सर्व कामे करणे.

**ब) पात्र उमेदवाराकरीता अटी -**

१. उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.

२. उमेदवाराला एम. पी. एस. सी. / यु. पी. एस. सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे प्रतिरोधीत केलेले नसावे किंवा अपात्र ठरवलेले नसावे.

३. उमेदवाराला नैतिक पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा त्याला/तिला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा त्याच्या / तिच्या विरुद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

४. न्यायालयीन कर्मचारी किंवा शासकीय कर्मचारी यांच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

५. त्याला/ तिला हयात असलेल्या पत्नी / पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

६. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास, २८ मार्च २००५ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

**क) निवड प्रक्रिया** -

वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करणेत येईल. अर्जाची छाननी केल्यावर पात्र ठरलेले अर्ज जास्त प्रमाणात असल्यास भरती प्रक्रिया समिती योग्य ते निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे सफाईकामगार पदासाठी अल्पसुची तयार करेल. अशी अल्पसूची (shortlist) तयार करण्याचे आणि निवड प्रक्रियेचे सर्व अधिकार भरती प्रक्रिया समिती यांचेकडे असणार आहेत. अल्पसूचीप्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

| अ.क्र. | मूल्यांकन पध्दती | गुण |
|---|---|---|
| १. | प्रात्यक्षिक चाचणी | ३० |
| २. | शारीरिक क्षमता चाचणी | १० |
| ३. | मुलाखत | १० |
| | **निवड प्रक्रियेचे एकूण गुण** | **५०** |

सूचनाः १.अल्पसूची मधील उमेदवारांना या सर्व सेवाप्रवेश प्रक्रीयेकरीता प्रवेशपत्र (Admit Card) देणेत येईल.

२.प्रात्यक्षिक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी मध्ये अनुत्तीर्ण झालेले उमेदवार पुढील प्रक्रियेसाठी अपात्र ठरतील.

३.सेवाप्रवेश प्रक्रियेबाबतची सर्व माहिती/सूचना/बदल जिल्हा न्यायालय, रत्नागिरी चे सूचना फलकावर व https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्याकरीता उमेदवाराने वेळोवेळी जिल्हा न्यायालयाचे वरील संकेतस्थळाची व सूचना फलकाची पहाणी करावी. यासंदर्भात कोणासही वैयक्तिकरित्या कळविण्यात येणार नाही.

## ड) उमेदवारांनी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या सत्यप्रती सादर कराव्यात.

१. जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र / जन्म प्रमाणपत्र / एस.एस.सी.बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority / Board Certificate of SSC)

२. शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांनी शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र.

३. शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पूर्वानुभव असल्यास त्या संबंधीचा संबंधित कार्यालयाचा दाखला.

४. जाहिरात प्रसिध्दी नंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठीत व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा पत्ता, फोन नंबर व शिक्यासह) **(परिशिष्ट ब)**

५. लहान कुटुंबाबाबत व फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे किंवा फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली नसल्याचे किंवा शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नसल्याचे तसेच जाहिरातीत नमुद सर्व सूचना व अटी मान्य असल्याचे स्वयं घोषणापत्र. **(परिशिष्ट क)**

६. सक्षम अधिकाऱ्याने प्रदान केलेला जातीचा दाखला. (केवळ मागासवर्गीयांसाठी)

७. उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना-हरकत प्रमाणपत्र.

८. विवाहित महिला उमेदवाराच्या बाबतीत जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदलेले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

९. अर्जामध्ये दिलेल्या इतर माहिती संदर्भातील आवश्यक कागदपत्रे.

१०. न्यायालयाचे प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्तऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

११. चारित्र्य दाखल्यां व्यतिरिक्त अन्य कोणतेही मूळ कागदपत्र किंवा प्रमाणपत्र अर्जासोबत जोडण्यात येऊ नयेत.

## इ) उमेदवारांना असेही सूचित करण्यात येते की

१. अर्ज विहित नमुन्यातच सादर करावा. (**जाहिरातीसोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' नमुन्यात**)

२. अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

३. विहित नमून्यात नसलेला आणि अपूर्ण माहिती असलेला अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

४. उमेदवाराने अर्ज भरताना संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी (असल्यास), जन्मतारीख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे.

५. मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी दाखल केलेल्या कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सोबत आणाव्यात.

६. उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता, अटी आणि निकष पूर्ण केले असतील अशा उमेदवारांचे अर्ज पुढील प्रक्रीयेकरीता योग्य ठरविणेत येईल.

७. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत / स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

८. जे उमेदवार शासकीय सेवेत आहेत त्यांनी त्यांचे विभाग/कार्यालय प्रमुखांची लेखी परवानगी घेऊनच अर्ज करावा. अशी परवानगी मुलाखतीचे वेळी सादर करावी. अशा उमेदवारांनी त्यांचे अर्ज आपापल्या विभाग/कार्यालय प्रमुखांच्या मार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

९. सफाई कामगार हे पद एकाकी असून पदोन्नतीची संधी उपलब्ध नाही. याबाबतची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**फ) उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना -**

१. सफाईकामगारच्या भरती प्रक्रियेकरीता जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यास भरती प्रक्रिया समिती योग्य ते निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे सफाईकामगार पदासाठी अल्पसुची तयार करेल. अल्पसुची करण्याचे सर्व अधिकार भरती प्रक्रिया समिती, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांनी स्वतःकड़े राखून ठेवले आहेत.

२. भरती प्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे, याबाबत सर्व अधिकार भरती प्रक्रिया समितीने स्वतःकडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही.

३. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास त्याला / तिला पदावरून काढून टाकण्यात येईल.

४. अल्पसुचित समाविष्ट उमेदवार / अर्जदार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला प्रात्यक्षिक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी करीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखतीपूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची अस्सल कागदपत्रांवरुन तपासणी करण्यात येईल. त्यावेळी उमेदवार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार अपात्र आढळल्यास त्या उमेदवारास या प्रक्रीयेमधुन अपात्र करण्यात येईल.

५. केवळ अर्ज दाखल केला यावरून सफाईकामगार या पदाच्या परीक्षांचा, मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही.

६. उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेत प्रात्यक्षिक चाचणी, शारीरिक क्षमता चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, रत्नागिरी जिल्हा न्यायालयाच्या प्रशासनाकडे याबाबत तोंडी अथवा लेखी केलेली कोणतीही तक्रार / दावा विचारात घेतला जाणार नाही किंवा ऐकला जाणार नाही.

७. उमेदवाराने त्याचे/तिचे एक जादा पासपोर्ट आकाराचे अलीकडील रंगीत छायाचित्र(Photo) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. उमेदवाराची मुलाखतीची पात्रता, त्याने प्रात्यक्षिक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी मध्ये मिळविलेल्या एकूण गुणांच्या आधारे काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारावर ठरविणेत येईल व जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पदांच्या संख्येच्या ३ पट उमेदवारांना मुलाखतीस बोलावले जाईल. १:३ हे गुणोत्तर राखण्यासाठी शेवटच्या उमेदवाराने मिळविलेल्या गुणांइतकेच गुण मिळविणारे एकपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. उमेदवारांची १० गुणांची तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

९. पात्र उमेदवारांना प्रात्यक्षिक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी तसेच मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१०. सफाईकामगार पदाचे प्रात्यक्षिक चाचणी व शारीरिक क्षमता चाचणी तसेच मुलाखतीसाठी येताना उमेदवारांनी स्वतःचे मूळ फोटो प्रमाणपत्र (Photo ID) उदाहरणार्थ अस्सल मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

११. उमेदवाराने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे त्याच्या/तिच्या उमेदवारीसाठी निवड समितीच्या सदस्यांना अथवा न्यायिक विभागाच्या अधिका-यांना भेटण्याचा तसेच कोणत्याही प्रकारे दबाव टाकण्याचा व गैरमार्गाचा प्रयत्न केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल याबाबतीत निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

१२. निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर त्याचे / तिचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल.

१३. उमेदवारांची निवड ही प्रात्यक्षिक चाचणी, शारीरिक क्षमता चाचणी व मुलाखतीत मिळालेल्या एकुण गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार केली जाईल.

१४. उमेदवाराने अल्पसूची नंतर दिलेले प्रवेशपत्र (Admit Card) प्रत्येक परिक्षेचेवेळी सोबत बाळगणे आवश्यक आहे.

१५. प्रवेशपत्र (Admit Card) शिवाय कोणत्याही परिक्षेला/मुलाखतीला प्रवेश दिला जाणार नाही.

१६. या निवड प्रक्रियेत भरती प्रक्रिया समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

आदेशावरून

सही/-
प्र.प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी

दिनांक : ०३ फेब्रुवारी २०२५.

**BLANK PAGE**

**नोंदणी क्रमांक**

(कार्यालया करीता )

## परिशिष्ट 'अ'

# जिल्हा व सत्र न्यायालय,
# रत्नागिरी

| अलीकडे काढण्यात आलेला उमेदवाराचा पासपोर्ट साईजचा फोटो |
|---|

प्रति,

माननीय प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
खारोघाट रोड,
ता.जि.रत्नागिरी ४१५६१२

## विषय : '' सफाईकामगार'' पदासाठी अर्ज.

मा.महोदय,

मी विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो/करते की, मी सफाई कामगार (पूर्णवेळ)या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| २. | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सह) | |
| ३. | राष्ट्रीयत्व | |
| ४. | उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय? | |
| ५. | दूरध्वनी / मोबाईल क्रमांक | |

| | | |
|---|---|---|
| ६. | ई–मेल ID | |
| ७. | लिंग | |
| ८. | धर्म | |
| ९. | जात व प्रवर्ग | |
| १०. | जन्म दिनांक | |
| ११. | जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय | _____ वर्षे _____ महिने _____ दिवस |
| १२. | उमेदवाराची वैवाहिक स्थिती (अविवाहित/ विवाहित/ घटस्फोटीत/ विधवा/ विधुर) | |
| १३. | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १४. | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या (असल्यास जन्मदिनांक नमुद करावा) | |

१५. **शैक्षणिक अर्हताः-**

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१६. **<u>सफाई कामाचा अनुभवः</u>**-

| अ. क्र. | अनुभव (संबंधित कार्यालयाचे नाव व पत्ता) | कालावधी | | एकूण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

| | | |
|---|---|---|
| १७. | इतर विशेष / अतिरिक्त अर्हता | |
| १८. | ज्ञात भाषा | |
| १९. | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यासः | |
| | अ) कार्यालयाचे नाव | |
| | ब) धारण केलेले पद | |
| | क) नियुक्ती दिनांक | |
| | ड) अर्ज करताना सदर कार्यालयाद्वारे ना–हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे का? | |
| २०. | उमेदवाराविरुध्द कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का? (असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही |

| | | |
|---|---|---|
| २१. | उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे का?<br>(असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही |
| २२. | उमेदवाराविरुध्द (शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास) शिस्तभंगाची चौकशी सुरु आहे का?<br>(असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही |
| २३. | कोणत्याही न्यायालय / एम.पी.एस.सी. / यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा प्रक्रियेत उपस्थित राहण्यापासून कायमस्वरुपी किंवा काही कालावधीसाठी प्रतिरोधीत केलेले आहे का?<br>(असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही |

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, वरील नमुद केलेली माहिती अचूक तसेच जाणीवपूर्वक दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांकः

ठिकाणः

उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

<u>उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी खालील अनुक्रमांकानुसार लिहावी</u>.

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

४. ______________________________

५. ______________________________

६. ______________________________

७. ______________________________

८. ______________________________

९. ______________________________

१०. ______________________________

११. ______________________________

१२. ______________________________

१३. ______________________________

१४. ______________________________

१५. ______________________________

**BLANK PAGE**

**परिशिष्ट 'ब'**

## चारित्र्य(वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु. ..................................................... ........................................... हे .............................. तालुका .............................. जिल्हा ............................ येथील रहिवासी असून, मी त्यांना मागील ............. वर्षापासून ओळखतो/ ओळखते, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते माझे नातेवाईक नाहीत.

करीता सदरील चारित्र्य(वर्तणूक) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

**ठिकाणः**– ................................

**दिनांकः**– ................................

**प्रमाणपत्र देणाऱ्याची सही, नाव व हुद्दा**

**सहीः**– .............................................

**नावः**– .............................................

**हुद्दाः**– .............................................

(शिक्का/रबरी शिक्का)
(**Seal/Rubber Stamp**)

**पत्ताः**– .............................................

.............................................

.............................................

**भ्रमणध्वनी क्र.**– ..................................

**BLANK PAGE**

**परिशिष्ट 'क'**

## प्रतिज्ञापत्र

मी, श्री/श्रीमती/कु..............................................................................................

श्री/श्रीमती ........................................................................ यांचा मुलगा/ मुलगी/

पती/ पत्नी, वय ............................ वर्ष, राहणार .................................... याद्वारे पुढील

प्रमाणे जाहीर करतो / करते की,

१) मी सफाई कामगार या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.

२) आज रोजी मला ............... (संख्या) इतकी मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ............... आहे. (जन्मदिनांक नमूद करावा)

३) मला जाणीव आहे की, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासनाद्वारे जारी करण्यात आलेल्या दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेनुसार, हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे ह्या पदासाठी मी अपात्र होईन.

४) मी असेही जाहीर करतो/ करते की, माझ्या विरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही किंवा मला फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली नाही किंवा माझ्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही झालेली नाही.

५) या जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व सूचना व अटी मला मान्य आहेत.

**उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**

**ठिकाणः–** .................................

**दिनांकः–** .................................